# ॥ चैतन्य लहरी ॥



परमपूज्य माताजी श्री निर्मलादेवी

अंक क्र.१०

वर्ष १९९३ - ९४

# ''लॉस एंजलीस येथील बुद्ध पूजेमध्ये (जुलै १९८८) परमपूज्य श्री माताजींच्या चरणी सहज योग्यांची प्रार्थना''

**ॐ श्री माताजी आपल्या चरणी पुन्हा पुन्हा प्रणाम,या पृथ्वीवरील सर्वांची कल्याणासाठी, विश्वाच्या विशुद्धी चक्रामधील आपल्या बुद्ध पूजेत, सहज संघ आपल्या चरणी प्रार्थना करीत आहे.**

श्री माताजी आपल्या आज्ञेने सर्व सहज योग्यांच्यात बोधचित्त म्हणजे आत्म्याच्या प्रकाशाने प्रकाशित झालेली जाणीव, सर्वांगाने जागृत होऊ दे,सर्वांच्यावर आपले कृपा छत्र असू दे,आपल्या भारतीस सर्व बोधीसत्व असावेत.

श्री माताजी आपल्या आज्ञेने अमोघसिद्धी, म्हणजे आत्मतत्व घटीत होण्यासाठी सर्व कांही प्राप्त करून देणारी सूज्ञता जागृत होऊ दे!

श्री माताजी आपल्या आज्ञेने, सर्व गोष्टी मध्ये संतूलन शिकविणारी रत्नसंभवा शक्ति जागृत होऊ दे.

श्री माताजी आपल्या कृपेने अक्षोभ्य म्हणजे सर्व प्रतिबिंबित करणाऱ्या दर्पणाची सूज्ञता जागृत होऊ दे.

श्री माताजी आपल्या कृपेने सत् आणि असत् दर्शविणाऱ्या विवेकाचा चिरंतन प्रकाश टिकविणारा अमिताभ, जागृत होऊ दे.

श्री माताजी आपल्या कृपेने विश्वातील व त्यांच्याही पलीकडील वैश्विक सुसंवाद वैरोचन जागृत होऊ दे.

श्री माताजी आपल्या आज्ञेने सहस्त्र हातांनी परमेश्वरी करुणा कार्यान्वित करणारा अवलोकितेश्वर जागृत होऊ दे.

श्री माताजी हे आदिशक्ति, सर्व देवतांच्या माता, परमेश्वराच्या आद्य प्रकाश, आपल्या चरणी पुन्हा पुन्हा प्रणाम.

आपण सर्व कार्याच्या मूळाशी असलेले कारण आहात,कोणत्याही कार्याला लाभणारे यश आपणच आहात,आपणच निर्मिलेल्या असंख्य विश्वातील केवळ आपणच कर्त्या करवित्या आहात.

आपणच श्री महामाया आहात, परमात्म्याच्या आद्य अहंकाराच्या, कपिलवस्तूचे राजकुमार जे आपल्या कृपेने बुद्ध झाले, त्यांच्या माता आपणच आहात,आपल्या चरणी पुन्हा पुन्हा प्रणाम.

श्री माताजी, इतर सर्वांना अप्राप्य असणाऱ्या आपल्या तेजात आपणच केवळ सृजन करणाऱ्या सर्व कार्य करविल्या आहात,असंख्य राक्षसांचा संहार करणाऱ्या आहात,व केवळ महत अहंकार आहात.

आमच्या कर्मापासून आणि स्वतःच्या दुष्कृत्यांच्यामुळे आम्ही ओढवून घेतलेल्या सर्व नाशापासून आपणच केवळ आम्हाला वाचवू शकता.

**श्री माताजी मानवाच्या या दुष्कृत्यांचा निरास करा.**

श्री माताजी आपणच मात्रेयाचा महान अवतार आहात, मानवी रूपात अवतरलेले ईश्वरी प्रेम आहात. कलकीच्या श्वेत अश्वाच्या स्वामिनी आहात.

श्री माताजी, भौतिकतेच्या पिश्चाच्यामुळे झपाटलेल्या औद्योगिक उत्पादन यंत्रणेमध्ये लक्षावधी शरीरांचा व मनांचा घास घेण्याची क्षमता आहे.

**हे आदि शक्ति मानवाच्या दुष्कृत्यांचे आपण निराकरण करा.**

पुढील मजकुर मागिल पानावर -

# १० जुलै १९८८ रोजी हंसाचक्र पुजेच्या दिवशी

# - श्री माताजींनी केलेला उपदेश -

आज आपण जर्मनीमध्ये हंस पूजा करायचे ठरविले आहे. आतापर्यंत हंस चक्राकडे विशेष लक्ष दिले नाही, मला वाटतं भारतीयांपेक्षा पाश्चात्य जगातील लोकांना हे चक्र फार महत्वाचे आहे. त्याचे कारण असे की हंसा चक्रामध्ये ईडा आणि पिंगला बाहेर येतात आणि त्याचा आविष्कार होतो. याचा अर्थ हंसा चक्रामधून ईडा आणि पिंगला यांचा प्रत्यय दिला जातो, तर हे हंसा चक्र असे आहे कीं ते आज्ञा चक्रा पर्यंत गेलेले नाही परंतू ते ईडा-पिंगलाच्या काही धाग्यांना किंवा काही भागांना धरून आहे, व ते धागे अथवा भाग तुमच्या नाकाच्या बाजूकडे प्रवाहित होऊ लागतात, व त्यांचा आविष्कार तुमचे डोळे तुमचे तोंड तुमचे कपाळ इत्यादींतून होत असतो. तुम्हाला हे माहित आहे की विशुद्धी चक्राच्या सोळा पाकळ्या असून त्या तुमचे डोळे, नाक, जीभ, दांत वगैरेचे नियंत्रण करतात. परंतू ह्या सर्वांचा प्रत्यय आपल्याला हंसा चक्रामधून होतो म्हणून पाश्चात्य मनाला हंसा चक्र समजणे अत्यंत महत्वाचे आहे. या संदर्भात संस्कृतमध्ये एक सुंदर सुभाषित आहे.

**"हंसा श्वेता बका: श्वेता को भेदो हंस बकयो: ।**
**निर क्षिर विवेकेन् हंसो हंसा: बको बक: ॥**

याचा अर्थ हंस आणि बगळा दोन्हीही श्वेत (पांढरे) आहेत परंतू दोन्हीमध्ये फरक काय आहे. तुम्ही जर पाणि आणि दूध मिसळले तर हंस फक्त त्यातील दूधच पिऊन घेईल परंतु बगळा मात्र तसे करणार नाही तर हंस पाणि आणि दूध यांच्यामध्ये फरक करुं शकतो या उलट बगळा करुं शकणार नाही. सहज योग्यांच्या दृष्टीने हे समजावून घेणे फारच महत्वाचे आहे. आपल्या स्वत:मध्ये तारतम्य भाव समजणे व तो वृद्धिंगत करणे सहजयोगामध्ये फारच महत्वाचे आंहे. पण ते पाहण्यापूर्वि प्रथम हे पाहूंया कीं आपल्याला जे बाहेर सांगायचे आहे त्याचा आविष्कार करण्यासाठी तारतम्य किती महत्वाचे आहे.

पश्चिमेकडील आपल्या लोकांना स्वत:ला जे कांही वाटते ते बाहेर दाखवायचे असते. तुम्ही कसे दिसता त्याला फार महत्व आहे. तुम्ही कुठे दिसता, काय दिसता, काय पाहता यांना फारच महत्व आहे. आपण चांगले दिसणे फारच महत्वाचे असते. त्या वरती बराच वेळ खर्च करतात. याशिवाय प्रचार माध्यम ही एक पद्धत आहे. त्या प्रचार माध्यमातून देश बोलत असतो आणि त्या माध्यमांसाठी शिक्षणही असते. प्रत्येक देशाची काही ना काही तरी विशेषता असते, आणि तुम्ही जेव्हा ते पहाल तेव्हा तुम्हाला जाणवेल की त्यांच्यामध्ये तारतम्य (डिसक्रिशन) फारच कमी आहे. त्याच प्रमाणे आपल्या बोलण्यात, आपल्या वाङ्मयांत, आपल्या काव्यांत, आपल्या संबंधात, प्रत्येक प्रकारच्या आविष्कारांत तारतम्याची (डिसक्रिशन) आवश्यकता असते व ते म्हणजे आपल्यामध्ये खोल असलेली सूज्ञता अथवा ज्ञान.

पाश्चात्य लोक जर एवढे बहिर्मुख असते तर मला वाटते फारच बरे झाले असते. समजा इंग्लंड मध्ये लोक 'पंक्स' झाले नसते तर जणू कांही बाकीचे त्यांना हसतील व त्यांना वाटेल, या माणसाकडे पंक बनण्यासाठी पैसेच नाहीत, ज्या

समाजात विवेक नसतो किंवा अतिशय बहिर्मुखता असते त्या समाजात अशा प्रकारच्या फॅशन्सची निर्मिती होते.ज्या ठिकाणी समाजामध्ये परंपरांची मुळे खोलवर गेलेली आहेत किंवा जीवनाची यथार्थ समज त्यांना आली आहे अशा देशांत फॅशन्स कार्यान्वित होत नाहीत.अर्थात जे देश प्राचीन आहेत त्यांनी त्यांच्या परंपरेने चुका करायच्या व त्या सुधारावयाच्या अशा पद्धतीचा अवलंब करून आपल्यामध्ये विवेक व समझदारी. यांना विकसीत केले आहे.परंतू जे देश अशा कसोट्यांमधून गेले नाहीत. ज्यांना अशा अनुशासनामधून जावे लागले नाही. ते विवेकाच्या बाबतीत कमकुवत राहिले. म्हणून अनेक लोक त्यांच्यात जरी अंत:करणापासून मुमूक्षुना होती तरी ते चुकीच्या मार्गाने गेले त्यांच्यात जर विवेक असता तर ते भलत्या मार्गाने गेले नसते. अथवा चुकीच्या जागी गेले नसते. पण त्याच्यांत विवेक नव्हता.

तर तुमच्यातील ईडा व पिंगला नाड्यांचा कसा वापर करायचा या विवेकापर्यंत. अथवा चांगले काय व वाईट काय हे समजण्याच्या विवेकांपर्यंत आपण पोहोचतो.आता ईडा नाडी पाहुयां. ईडा नाडी फारच महत्वपूर्ण आहे. कारण या मधिल विवेक परंपरागत समजूतदारपणातून येतो.ईडा नाडीची सुरुवात श्री गणेशांच्या स्थानापासून म्हणजे मुलाधारातून होते. म्हणून आपल्यात जर विवेक नसेल तर आपल्याला मूलाधारातील सर्वात महान अशा पाठिंब्याचा. मदतीचा, पवित्र व मंगलमय पोषकतेचा. लाभ होत नाही. आणि मग नेहमीच जे आपल्या प्रगतीला घातक आहे. आपल्याच नव्हे तर सर्व देशाला विनाशकारी आहे.त्याचा स्विकार करतो.जर विवेक नसेल तर आपल्यासाठी जे लोक विघातक आहेत तेच आपल्याला आवडू लागतात.

**विवेक म्हणजे जे तुमच्यासाठी चांगले आहे, कल्याणकारी आहे, सामुहिकतेसाठी व तुमच्या उन्नतिसाठी हितकर आहे त्याची तुम्ही निवड करता.** अविवेकी लोक वाईट लोकांनी रचून ठेवलेल्या सापळ्यात जाऊन अडकतात. फ्राईडचे उदाहरण घ्या.भारतीय लोकांचा फ्राईडच्या वेडगळ कल्पनांच्या मागे लोक इतके जातात यावर विश्वासच बसणार नाही. परंतु लोकांनी येशूला मानले नाही इतके फ्राईडला मानले. कारण विवेकाचा पूर्णतया अभाव होता. त्यांच्यामधे परंपरागत विवेक असता तर ते वाचले असते. परंपरागत विवेक ईडा नाडी मधून प्राप्त होतो.

आता याला लोक कंडिशनिंग म्हणतात आणि म्हणतात की कंडिशनिंग वाईट आहे.कंडिशनिंग करु नये कंडिशनिंग पासून मुक्त व्हावे. परंतू ही अत्यंत चुकीची कल्पना आहे. त्याच्यातही विवेक शून्यता दिसते. कोणते कंडिशनिंग चांगले आहे व कोणते वाईट आहे हे पहायला हवे.कंडिशनिंगचे बाबतीतही विवेक नसल्याने परंपरांचा त्याग केला जातो. आपल्या वाडवडिलांच्या पासून मिळालेल्या अनुभवाचा त्याग केला जातो. आपला इतिहास सोडून दिला जातो. व आपण म्हणतो आम्ही आता सर्वांच्या पलिकडे गेलो. आम्हाला अगदी मोकळं वाटतं जसं काल मला फारच आश्चर्य वाटलं. विमानांत मला कोणीतरी सांगितले की त्या व्यक्तिला अंगावर कपडे नसले म्हणजे फारच मोकळं वाटतं.जर अंगावर कपडेच त्यांना तुरुंगासारखे वाटतात तर खऱ्या तुरुंगात त्याचं काय होईल? पण विवेक नसल्याने अशा विचित्र कल्पना लोकांच्या डोक्यांत घुसतात व त्यांना वाटते कीं अशा खुळ्या कल्पनांचे समर्थन त्यांना करता येईल. बुद्धीमुळे तुम्हाला विवेक प्राप्त होतो असे नाही.बुध्दिमुळे. कंडिशनिंगचे बाबतीत असलेला विवेक तुम्हाला येत नाही. सहज योग्यांनी आपल्यामध्ये विवेक कसा विकसीत करायचा हे शिकणे फारच महत्वाचे आहे.कालच फ्रेंच स्त्रियांच्या पुढे स्त्रियांच्या बाबतीत असलेल्या विवेकावर माझे फारच सुंदर भाषण झाले.

**ईडा नाडी मधून प्राप्त होणारा विवेक म्हणजे पूर्व सूचना (इन्ट्यूशन) तुमच्या अंतर्यामी जर तुम्ही तुमच्या ध्यानाच्या शक्ति मधून तो विवेक विकसित केला तर तुम्हाला (इन्ट्यूशन) सूचना प्राप्त होते आणि इन्ट्यूशन म्हणजे तुमच्या भोवताली असलेल्या गणांनी तुम्हाला केलेली मदत होय. तुम्ही जर गणांची मदत घ्यायला शिकलात तर तुम्हाला पूर्व सूचना मिळत राहतील आणि स्वत:ची बुद्धी वापरावी न लागता तुम्ही योग्य तेच बोलू शकता.संपूर्ण सहजयोग किंवा मी म्हणेन त्याचा कमीत कमी पन्नास टक्के भाग हा इन्ट्यूशनवर आधारीत आहे. त्यासाठी तुम्हाला श्री गणेशांची जाणीव स्वत:मध्ये योग्य तशी विकसित करावी लागेल.**

तुम्हाला श्री गणेशांना योग्य प्रकारे समजवून घ्यायला हवे. येथूनच श्री गणेशांची सुरुवात होते. कारण ते गणपती आहेत. ते स्वामी आहेत. ते गणांचे मुख्य आहेत. तर गण

तुम्हाला इन्ट्यूशन देतात. उदा.मला कोठेतरी जायचं आहे आणि मग मी म्हणते मला तेथे उद्या जाता येणार नाही आणि काही तरी होऊन मी जाऊ शकत नाही.मग लोकांना वाटू लागते की श्री माताजी तुम्हाला हे कसं माहित,मला माहित असतं कारण गण आहेत आणि ते जे सांगतात ते सत्य असतं, त्यांना त्याच्या बद्दल सर्व माहिती असते अथवा एखाद्या बद्दल मी काही तरी म्हणते ते खरं ठरतं मग ते मला विचारतात श्री माताजी तुम्हाला ते कसं कळलं? माझं सर्व इन्ट्यूशनवर चालतं,जसं मला विमानांनी जायचं आहे आणि इन्ट्यूशनर्नी काय घडणार आहे ते मला समजतं,श्री गणेशांची भक्ति करुन हा भाग विकसीत करता येतो.

तेव्हा श्री गणेश हंसा चक्राच्या भागाचेही नियंत्रण करतात,जेव्हां आपण म्हणतो 'ह' आणि 'सा' हे दोन आज्ञाचे बीज मंत्र आहेत.परंतु जेंव्हा आज्ञा हंस चक्राला स्पर्श करते तेव्हा त्याची सुरुवात या इथून होते.म्हणून त्याच्या मूळाशी हंसा आहे.आणि त्या ठिकाणी 'हं' म्हणजे 'मी' असा अर्थ होतो.तुम्ही जर विवेकी असाल तर फॅशन करणार नाही. कोणत्याही मूर्खपणाच्या कल्पना मनांत ठेवून वागणार नाही.तुम्हांला स्वत:चे व्यक्तिमत्व आहे,तुम्ही सहजयोगी आहांत,तुम्ही जे लोक सहजयोगी नाहीत त्यांचे ऐकू नये हा झाला 'हं' चा भाग ह्याचा अर्थ अहंकार नव्हे तर 'हं' म्हणजे लक्षांत ठेवणे की मी योगी आहे,मला इतर लोकांना माहित नसलेल्या अनेक गोष्टी ठाऊक आहेत.मला इतरांशी काही करायचे नाही,त्यांचेकडून मला शिकण्यासारखे काही नाही. ते मला कांही शिकवू शकत नाहीत,ते काहीच जाणत नाहीत. मी त्यांचे पेक्षा बरेच कांही जाणतो तुमच्या स्वत:ची जाणीव असणे म्हणजे 'हं' व ती उजव्या बाजूतून येते असे मी म्हणेन.

उजव्या बाजूचा विवेक म्हणजे 'हं' डाव्या बाजूचा विवेक म्हणजे 'सा','सा' चा अर्थ तुम्ही म्हणजे तुम्हीच सर्व कांही अहात,तुमच्या बाबतीत (सहज योग्यांच्या) 'तुम्ही' म्हणजे कोण हे तुम्हाला माहितच आहे.परंतू प्रत्येक मानवासाठी तुम्ही म्हणजे परमात्मा याचा अर्थ तुम्हीच सर्व कांही आहात. 'सा' चा विवेक डाव्या बाजूकडून येतो तर 'हंसा' हा शब्द दोन प्रकारच्या विवेकातून निर्माण झाला आहे म्हणजे "मी" एका बाजूस पहायचे व "तुम्ही" एका बाजूस पाहायचे अशी ही दोन तराजूंची तावडी आहेत.या ठिकाणी किती सुंदरतेने त्यांनी हा तराजू दाखविला आहे,एका बाजूला सूर्य आहे व दुसऱ्या बाजूला चंद्र आहे,मधोमध संतूलन देणारा क्रॉस आहे की ज्याच्यामुळे तुम्हाला धर्म मिळतो. ह्या सर्वांचे एकावर एक पदर कसे जोडले आहेत . व धर्म विवेक शी कसा संलग्न केला आहे . ते पहा.

आता कांही लोक एकदमच एखादी क्रिया करत सुटतात . उदा.मी पाहिलं आहे कीं सहज योगी पुजेला आले की वेड्या सारखे बंधन देत असतात,रस्त्यात जाताना बंधन देतात - कोठेही जरी गेलं तरी वेड्यासारखे बंधन देत सुटतात ते एक कंडिशनिंग आहे,विवेक नव्हे व सहजयोगही नव्हे,बंधन घ्यावे की नाही हे व्यवस्थित पाहायला हवे. श्री माताजींच्या समोर आपण बंधनातच असतो मग स्वत:ला बंधन देण्यासारखे आणखी काय आहे ? परंतू मी बोलत असताना लोक कुंडलिनी चढवतात व स्वत:ला बंधन घेतात,मला वाटतं . ते सगळे वेडे लोक असावेत,तसंच काल मी ऐकलं की एका संगीताची रेकॉर्ड आश्रमात सगळीकडेच लावली जाते,कारण लोक उंटावर बसल्यावर उडतात तसे उड्या मारु लागतात,परंतू ते संगीत उंटासाठी असेल,आता प्रत्येक जण त्या रेकॉर्डचे कौतुक करतोय का? कारण ते उंटासारखे उड्या मारु लागलात की माणसाला ते सोडणे जमत नाही कारण त्यांना त्याची सवय होते.म्हणून त्यांना त्या प्रकारचे संगीत आवडते.ते उंटा सारखे उड्या मारतच राहतील कारण ते आता उंट झाले व त्यांना उंटासारखे वागायला हवे,आता जर एखाद संगीत घोड्यासारखे असेल तर ते घोड्यासारखे दुडकतील अथवा लांब लांब उड्या मारतील,एकदा ते संगीत लोक ऐकू लागले की ते त्याच तालात राहतात,आता ते लांब उड्या मारणारे घोडे झाले,आता घोडा उड्या मारु लागला आणि एकदा जे घोडे झाले की त्यांना ते गॅलपिंग म्यूझिक आवडू लागेल.आणि मग असं वाढत जाईल आता ते घोडे झाले मग गाढव होतील,मग आणखी काही होतील.

आपण काही जनावरे नव्हेत आपण मानव आहोत. आपण 'हं' आहोत.आपण सहजयोगी आहोत.कोणत्याही एका प्रकारचा ताल अथवा संगीत आपल्यावर जास्त प्रभाव पाडू शकत नाही.जो पर्यंत एखादी व्हरायटी धार्मिक आहे,जो पर्यंत ती संतुलित आहे मंगल आणि पवित्र आहे तो पर्यंत आपल्याला ती आवडते.तेव्हा 'हंसा' चक्रावर किती गोष्टींची पारख केली जाते.ते पहा - मला वाटते संपूर्ण सहजयोगच

'हंसा' चक्राच्या संतुलनावर उभा आहे. पुष्कळ लोक ॲसटश्यूट आहेत, प्रामाणिक आहेत, परंतू तो प्रामाणिकपणाही अगदी विचित्र होण्याच्या मर्यादेपर्यंत जातो. काही लोक फार मेहनती आहेत परंतू ते सुद्धा अगदी विचित्रपणा होईल इतक्या मर्यादेपर्यंत जातात. परंतू हे चांगले समजले जाणारे गुण काही धार्मिकतेतले नव्हेत तर धार्मिकता म्हणजे सतेज असलेला विवेक आहे. तुमच्याकडे जर विवेक असेल तर तो सतेज करुन तुम्ही तो धार्मिकतेत आणू शकता जसं खिस्ताचं उदाहरण घ्या. खिस्ताकडे किती विवेक होता जेव्हा मेरी मॅगडालीनला दगड मारले जात होते तेव्हां त्यांचा वेश्यांशी काहिही संबंध नव्हता. काही म्हणजे काहिही संबंध नव्हता. परंतू त्यांच्या विवेकातून ते हे जाणू शकले कीं त्या लोकांना तिला दगड मारायचे काहिही कारण नव्हते. स्वत:च्या धर्मात ते तिथे उभे राहिले व म्हणाले की "ज्यांनी कोणतेही पाप केलं नसेल त्यांनी मला दगड मारावेत" ही विवेकाची शक्ति आहे व त्यामुळे लोकांना स्वत: मधिल विवेक जाणवला व त्या विवेकातून त्यांच्या लक्षांत आलं की हा माणूस अतिशय पवित्र आहे, व त्याला आपण दगड मारु शकत नाही. सहजयोगी म्हणून तुम्ही जर डिसक्रीट झालात तर इतरांना ही तुम्ही डिसक्रिट म्हणजे विवेकी कराल. दुसऱ्यांनाही विवेकी व समजूतदार व्हावे लागेल. आणि जर तुम्ही हा विवेकाचा भाग वाढविलात तर तुमच्या मध्ये निरक्षीर विवेक म्हणजे पाणि व दूध वेगळं करणं - चांगल्या पासून वाईट वेगळं करणं वगैरे तुम्हाला प्राप्त होईल.

सहजयोगांमध्ये उजव्या बाजूच्या अविवेकीपणामुळे लोक प्रत्येक पायरीवर अडखळतात आणि उजव्या बाजूचा अविवेकीपणा आपल्या अहंकाराचे प्रदर्शन करण्यामधून येत असतो. मी सांगितलं तसं अहंकार 'हं' आहे. हा अहंकार जेव्हा कार्यरत व्हायला पाहिजे तेव्हा होत नाही. उदाहरणार्थ - काही लोक लग्नासाठी चर्चमध्ये गेले अर्थात ते सहजयोग्यांचे चुकले आपण कोणत्याही मानवी धर्मावर विश्वास ठेवत नाही. परंतू तुम्ही चर्चला गेलात ठीक आहे आणि त्यांनी एका बाईला वॉश ॲशले नावांचे ड्रेस खरेदी करण्यासाठी लंडनला पाठविले - आणि मला वाटतं काही लोक लग्नासाठी म्हणून टेलकोट ही घालत होते. मग तो अहंकार कोठे गेला. सहजयोगी म्हणून तुमचा जो अहंकार होता तो पूर्णपणे वाया गेला मग ते लोक केस कापायलाही गेले आणि मला वाटतं इतरही काही गोष्टी त्यांनी केल्या. त्यांना जुन्या खिश्चन लोकांसारखे चालत मूर्ख बिशप लोकांच्या थडग्याच्या बाजूने चर्चला जायचे होते - आणि हे इथेच आहे असे नाही तर भारतात सुद्धा या पेक्षा मोठ्या प्रमाणावर आहे. धर्म म्हटला की लोकांना डाव्या बाजूचे कंडिशनिंग येते आणि मग विवेक म्हणजे काय ते समजतच नाही. उदा. ज्ञानेश्वर फार मोठे अवतरण होते त्यांना काही पायात घालायलाही नव्हते पण आज काल त्यांच्या तथा कथित पादूका पालखीत ठेवून त्यांची मोठी मिरवणूक काढतात. त्यांची भजने गात असतात. आता ज्ञानेश्वरांना पायात घालायला चपला सुद्धा नव्हत्या हे या मंडळीना कोणी सांगायचं. तर ते पालखीतून काय मिरवता आणि जिथे जिथे ज्या ज्या शहरांत ते जातात तिथं तिथं या मंडळींना पक्वान्नाचं जेवण दिलं जाते. आणि लोक त्यांच्या पाया पडतात. की संत आले आहेत आणि पालखीतल्या पादूका ज्ञानेश्वरांच्या नसतातच.

तर हा वेडेपणा चालूच असतो. या सगळ्या गोष्टी तुमच्या अवती भवती होत असलेल्या पाहता प्रत्येक धर्मात, प्रत्येक देशांत, प्रत्येक विभागांत ह्या गोष्टी घडताना आपल्याला दिसतात. परंतू तुम्ही त्यांच्याशी हात मिळविता, तुम्ही त्याच्यातले एक होता. आणि मग तुम्हाला काय झालंय ते समजतच नाही. आता हा **अहंकार जर व्यवस्थित वापरला तर तो विवेक आहे.** अजूनसुद्धा लोकांना धर्माशिवाय आणखी एक विचित्र कार्डशनिंग आहे. ते म्हणजे देशांचे मी भारताचा आहे मी इंग्लडंचा आहे, मी जर्मनीचा आहे हे सर्व वाईट आहे. मला असे सांगायचे आहे की अशा प्रकारच्या भावना असणं याचा अर्थ तुमची सहस्त्राराच्या भूमिवर काहीही वाढ झाली नाही जे आपल्या राष्ट्रियत्वाशी एकरुप झाले त्यांच्या हे लक्षातच आले नाही की त्यांचे राष्ट्रियत्व आता परिवर्तित झाले आहे. खरे म्हणजे ज्या ठिकाणी परमेश्वराचे राज्य आहे त्या ठिकाणी पासपोर्टची आवश्यकता नाही. तो तुमच्या चेहऱ्या वरुनच दिसतो. परंतू अद्यापी खोलवर एक कार्डशनिंग आहे. आणि ते म्हणजे मी अमुक अमुक देशाचा आहे. माझा देश फार महान आहे. तुझा देश चांगला नाही वगैरे. परंतू डिसक्रिशनच्या म्हणजे असा विचार करणे की ठिक आहे मी जर्मनीचा आहे व जर्मनीने फार चुका केल्या आहेत म्हणून मला त्या सुधारु देत म्हणजे ज्या स्थानामध्ये सर्व शांती

आनंद व सुख नांदत आहे त्या ठिकाणी मी जर्मन लोकांना घेऊन जाईन.अशा तऱ्हेने विवेकात कंडिशनिंगचा उपयोग करतात.प्रत्येक गोष्टी मध्ये तुमच्या लक्षात येईल की दोन बाजू असतात - कोणच्या बाजूकडे जायचे हा विवेक (डिसक्रिशन) तुमचा आहे.उदा. या लोकांना एका विशिष्ट धर्माचे कांडिशनिंग आहे.समजा ते ज्यू धर्माचे आहेत आणि जे सहज योगात आले अथवा ते ख्रिश्चन धर्माचे आहेत व सहज योगात आले तर मग विवेक कोणाचा ज्यू अथवा ख्रिश्चन माणूस सहजयोगांत आला की आत्म्यांच्या बंधुत्वामध्ये सर्वजण मोठे मित्र होतात,कारण ती ज्यू आहेत, मी ज्यू आहे, माझे वडील ज्यू आहेत माझी आई ज्यू आहे.ख्रिश्चनांचही तसच इतर समाजाचेही तसेच आहे व तुमच्या कोठल्या राष्ट्रियत्वाचेही तसेच आहे.

आतां तुम्ही जेंव्हा शोधत असता तेंव्हा हाचा विवेक कोणता त्या वेळी सर्वात उत्तम गोष्ट म्हणजे की त्या क्षणी असा विवेक ठेवून पाहणे की अनक्या तनक्या मानव निर्मित धर्माचे दोष कोणचे आहेत किंवा जे धर्म अवतारी पुरुषांच्या मृत्यूनंतर किंवा ज्या प्रेषितांनी हे धर्म सुरु केले ते प्रस्थापित झाले आहेत त्यांचे दुसरा विवेक म्हणजे त्या धर्माची शास्त्रे वाचणे आणि त्यात पहायचे की अवतारांनी विशेष असं काय सांगितलं आहे. उदा. एखादा मुसलमान आहे तर त्याने कुराणात वाचून हे पहायचे की त्यात सहजयोगासंबंधी काय लिहीलं आहे. जर एखादा ख्रिश्चन असेल तर त्याने बायबल वाचून त्यामध्ये हे पहायचे की त्यात सहजयोगासंबंधी काय लिहीले आहे.कारण सहजयोग सत्य आहे आणि काय सत्य लिहीलं आहे ते शोधून काढलं पाहिजे.जर अशी सवय आपण लावून घेतली तर तुमची प्रगती होईल. **तुम्ही जर शूर असाल आणि तेवढेच धैर्यवान असाल तर जाऊन लोकांना सांगा की कोणत्या मुर्खासारख्या गोष्टी करता आहांत. हे कुठेच लिहलेलं नाही.कुठेच केले जात नाही. आणि सहजयोग म्हणजे सर्व लिहून ठेवलेल्या शास्त्रांचे मर्म आहे.** ही तीसरी स्थिती झाली की ज्यामध्ये तुम्ही विशिष्ट धर्म, राष्ट्रियत्व वगैरेच्या बाबतीत विवेकाचा उपयोग केला, ज्यांना मी पश्चिमेकडे असते तेंव्हा पश्चिमेकडील प्रश्नांची चर्चा करायला हवी.परंतू मी जेव्हां भारतात असते तेव्हा तुम्ही माझी भाषणे ऐकावीत त्यांची भाषा तुम्हाला समजत नाही ते बरे आहे नाहीतर त्याच्याबद्दल तुम्हाला वाटणारा आदर एकदम निघून जाईल. मी त्यांना चांगले फैलावर घेत असते आणि त्यांच कोठे चुकलं ते त्यांना सांगत असते.परंतु या ठिकाणी पश्चिमेत आपल्याकडेच फार चुकीच्या गोष्टी आहेत तर विवेक म्हणजे आमचं कुठं काय चुकलं ते शोधून काढणें.उदा. बायकांची बाहेर साड्या नेसायची हिम्मत होत नाही. जर भारतीय लोक तुमच्या पद्धतीचे कपडे घालतात तर तुम्ही सुद्धा साड्या नेसू शकता. अथवा पुरुष बाहेर भारतीय पद्धतीचे कपडे वापरत नाहित त्यासाठी थोडीशी 'हं' ची जरुरी आहे.त्यांना ते आवडतात परंतू ते वापरणार नाहित. ते विचित्र प्रकारच्या पॅन्टस् घालतील किंवा पंकी पद्धतीचे साहित्य वापरतील परंतू जे व्यवस्थित दिसेल. सुज्ञतेचे असेल व वापरण्यासाठी योग्य असेल ते वापरणार नाहित. ज्यामुळें तुम्हाला आपण निराळे लोक आहोत याची सतत कल्पना येत राहिल.असं काही तरी असलं पाहिजे. **आता कपाळावरचा हा तांबडा टिळा व तो लावनं आवश्यक आहे कारण त्यामुळे तुम्हाला भूतांची पकड येत नाही.** बायबलमध्ये असं लिहलं आहे की त्यांच्या कपाळावर टिळा असेल पण हरे कृष्ण हरे राम सारखे अनेक मूर्ख लोक असल्या कारणाने ते अश्या प्रकारचा टिळा लावतील असे मला वाटत नाही. आपल्याला समाजाची भीती वाटते नां! मग टिळा कसा लावायचा.समजा ते म्हणाले की तुम्ही केस पिंजारून हिंडा तर तुम्हाला ते चालेल कारण तसे केलेले समाजाला चालते. आपण लोकांनी कोणत्याही समाजाला घाबरायचे नाही. आपल्याला त्यांच्यावर यायचे आहे.लोकांना शिकवायचे आहे व सांगायचे आहे की जे योग्य आहे व बरोबर आहे ते आम्ही करणार मग तुम्हाला ते आवडो अथवा न आवडो.ती संताची खूण आहे. तुम्ही जर संतांना कुठेही पहायचे असेल तर लोकांना समजावून सांगण्यासाठी जे बरोबर आहे. ज्याचा अवलंब करणं आवश्यक आहे ते तुम्ही आवश्य करा. ही संताचीच खूण आहे.तुमचे संत लोक कधी-कधी समाजात मिसळून जातात, कधी सहजयोगामध्ये, कधी इकडे तिकडे. तर मग अशा संताचा काय उपयोग? तुम्हाला माहित असलेल्या संतापैकी मला एक तरी असा दाखवा कीं जो समाजाशी भांडला नाही व तेही अगदी ठासून न घाबरता त्यांनी सांगितले - तुम्हाला असा संत माहित आहे किंवा नाही.

---

# दिवाळी पूजा

**प.पू. माताजी श्री निर्मला देवींनी**
**दि.१२/११/१९९३ रोजी रशियांत दिलेल्या भाषणाचा सारांश -**

श्री लक्ष्मीची पूजा करण्यासाठी सर्व जगातून लोक आज रशियांत आले हे पाहून फार संतोष होत आहे.

ज्या वेळी तुम्ही सर्व गोष्टी बुध्दीने समजावून देऊ शकत नाही त्यावेळी तुम्ही कोणती तरी कला अवगत करुन तुमचे म्हणणे विषद करता. अथवा एखाद्या प्रतिकात्मक गोष्टींच्या आधारे समजावून देता जेव्हा तुम्ही भौतिक दृष्ट्या समजावून देऊ शकत नाही. हेच काम कलाकार व कवि करतात. ते त्यांच्या कल्पना शक्तिच्या जोरावर एखादे प्रतिक निर्माण करतात. परंतू त्यांच्या कल्पक मनाला मर्यादा असतात आणि त्यांची कल्पना शक्ति अश्या अवस्थेला जाते कीं त्यापुढे सत्याचा आधार अथवा वस्तूस्थितीशी संबंध रहात नाही आणि त्यावेळी ती अपुरी पडते. सर्व रेखाकृती हालचाली मध्ये पतन होते व त्यांना उतरती कळा प्राप्त होते. हे आपणांस सर्वच क्षेत्रात दिसून येते पण आजकाल विशेषत: सर्वच जे उदात्त आहे त्याला उतरती कळा आली आहे.

परंतु तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळाल्यानंतर तुम्ही आत्मा झाला आहात आणि तुमची कल्पना शक्ति वास्तवाला स्पर्श करु/ शोधू शकते. नंतर ज्या प्रतिमा विकृत आणि विपर्यस्त होत्या त्या नष्ट होऊन तुम्ही प्रतिमांचे वास्तव रुप जाणू शकता. अगदी बरोबर हेच सगळीकडे झाले आहे. उदाहरणार्थ - भारतात आम्हाला श्री लक्ष्मी हे संपत्तीचे प्रतिक आहे. संतांनी आणि दृष्ट्या लोकांनी लक्ष्मीच्या प्रतिमेचे वर्णन केले आहे वास्तव केले आहे पण पुढे ते प्रतिक लोकांना समजले नाही किं वा त्या मागील वास्तव, त्यांनी ते लक्ष्मीचे प्रतिक म्हणजे पैसा, संपत्ती, सोने, चांदी, हिरे असे समजून त्यांनी संपत्तीची पूजा/उपासना करणे सुरु केले.

लोकांना हे समजत नाही कीं जेव्हा त्यांच्याकडे पैसा असतो तेव्हा ते चुकीच्या गोष्टी का करु लागतात. लक्ष्मीचे प्रतिक फार वेगळे आहे. प्रथम ज्याच्याकडे लक्ष्मी आहे तो माते प्रमाणे - ज्या मातेला, मातेप्रमाणे आपल्या मुलांबद्दल मातृप्रेम असेल, अश्या माते प्रमाणे माता असले पाहिजे. लक्ष्मी ही नारी प्रमाणे पाहिजे, आणि नारी ही अत्युत्कृष्टतेची प्रतिक आहे. आई ही सर्व शक्तिंचे उगमस्थान आहे. तीला सहनशिलता, प्रेम आणि दया असायला हवी. ज्याच्याजवळ संपत्ती आहे तो दयाळू असल्याशिवाय तो सुखी होऊ शकत नाही. तो ती संपत्ती दुसऱ्याला देण्यात उपयोग करतो. आत्ताच्या काळात जे देश समृद्ध म्हणून समजले जातात त्यांनी आपल्या स्वत:जवळ असलेल्या पैशांचे उपयोग स्वत:चेच जास्तीत जास्त नुकसान करुन घेण्यासाठी केला. त्यांनी आपला पैसा, राग, लोभ आणि लालसा यांचे प्रदर्शन करण्यासाठी वापरला.

त्यांनी तो पैसा आम्ही कोणीतरी वैशिष्ठ पूर्ण आहोत हे दाखविण्यासाठी वाया घालविला,जसे अमेरिकेत मला एक खूप श्रीमंत मनुष्य भेटला . जेव्हा मी त्याच्या मोटारीजवळ पोहोचले तेव्हा त्याने सांगितले की ह्या मोटारीच्या दाराच्या मुठी वेगळ्या तऱ्हेने दुसऱ्या बाजुसही दारे उघडतात.तेव्हा मी म्हणाले ह्या अश्या गोष्टींचा काय उपयोग एखादा माणूस तुझ्या मोटारीत अडकून बसेल. तो म्हणाला ही माझी वैयक्तिकता आहे ती माझी अलौकिकता आहे त्याने तर हे तयार केले की जे सर्वसाधारण नाही.मी जेव्हां त्यांच्या घरात गेले तेव्हा त्यांनी मला सांगितले की हे स्नानगृह वैशिष्ठपूर्ण आहे तेव्हा खबरदारी घ्या.तुम्ही जर ही कळ दाबलीत तर तुम्ही एक दम ह्या पोहण्याच्या तलावात पडाल.तेव्हा मी त्या बाथरूम मध्ये जाऊ इच्छित नसल्याचे त्यांना सांगितले. तद्नंतर त्याने त्यांचे बेडरूम दाखविले व सांगितले की तुम्ही जर हे बटण दाबलेत तर तुमचे डोके असे वर होईल. तेव्हा मी त्यांना सांगितले की ह्या सर्व कसरती करण्यापेक्षा मी जमीनीवरच झोपेन.

समृद्ध म्हणविले जाणारे अमेरिकनस् अथवा युरोपियनस् खूप सुखी आहेत असे लोकांना वाटते,त्यांच्याजवळ विवेक नसल्यामुळे ते सुखी नाहीत. ते आपली समृद्धी वर सांगितल्याप्रमाणे खर्चून वाया घालवतात त्यांच्याजवळ येवढा पैसा आहे . त्यांचं काय करायचे हे त्यांना समजत नाही. आता त्यांना ती अपूरी वाटू लागली आहे व ते आणखी मिळविण्याच्या मागे लागले आहेत.म्हणून ते ड्रगज् किंवा त्या सारख्या गोष्टीच्या मागे लागले.खरोखरी लक्ष्मी तत्व असे आहे.ती माता आहे आणि तीच्या दोनही हातात गुलाबी रंगाची कमळे आहेत.कमळ हे अेक असे फूल आहे की जे तळ्यात उगवते व भुंग्यासारख्या काटेरी कि टकासही (भुंगा) सामावून घेते.ह्याचा अर्थ असा की ज्या माणसांकडे संपत्ती आहे अश्यांचे घर सर्वांना सामावून घेणारे व सुंदर असायला हवे.भुंगा हा किटक आपल्या काटेरी पायांसहीत त्या कमळाच्या प्रभा मंडळात छान सोपी जातो आणि रात्री कमळ त्याला थंडी वाजू नये म्हणून मिटते.

श्रीमंत माणूस हा लक्ष्मी पती नसतो. त्याला लक्ष्मीचे आर्शिवाद मिळत नाहीत. परंतू विवेक असणाऱ्या श्रीमंत माणसास लक्ष्मीचे आर्शिवाद लाभतात.जसे कमळ आपल्यांत दुसऱ्याला सामावून घेण्यास उत्सुक व आदरातिथ्यशिल असते.त्याचप्रमाणे/सारखे ज्या श्रीमंत माणसास लक्ष्मीने आर्शिवादित केले आहे असे समजावे तो आदरातिथ्यशिल असावा.

आश्चर्याची गोष्ट अशी आहे की आता जी राष्ट्रे समृद्ध समजली जातात ती सर्व बांडगुळा प्रमाणें आहेत.त्यांनी इतर देशांचे शोषण केले आहे.त्यांनी साम्राज्य स्थापन केले आहे. जसे भारताचे - ब्रिटीश लोक कोणताही पासपोर्ट अथवा व्हिसा न घेता ३०० वर्षे भारताचे पाहुणे होते.हल्ली कोणा भारतीयांस इंग्लंडला जायचे असेल तर ती अशक्य प्राय गोष्ट झाली आहे. जे कोणी तेथे जातात त्यांना तेथे चांगली वागणूक मिळत नाही. असेच अमेरिकेतही आहे. देवाचे आभार माना की कोलंबस भारताकडे यावयास निघाले परंतू हनुमानानी त्याला अमेरिकेत नेले. नाहीतर भारतीयांची काही खैर नव्हती.त्यांनी तेथे (अमेरिकेत) रेड इंडियन लोकांची कत्तल केली . त्यांची जमीन बळकावून घेतली . आणि आता ते स्वत:ला श्रीमंत समजत आहेत.त्यांनी केलेली पापं त्यांना फेडावी लागतील.जे जास्त संपत्ती मिळवू शकतात म्हणून श्रेष्ठ जातीचे आहेत असे समजतात त्याच्या बद्दल आपण पाहू शकतो.त्या लोकांनी लोकांना गॅस चेंबर मध्ये कोंडून ठार मारले आणि सर्व प्रकारच्या अशोभनिय गोष्टी केल्या हे काय मोठेपणाचे लक्षण आहे का य? जर ख्रिस्त हे पवित्र/उदात्त व्यक्तिमत्वांचे प्रतिक आहेत तर त्यांचे सद्गुण कोणते? ते एक थोर मनाचे उच्च व्यक्तिमत्व होते कारण त्यांच्या वागण्यात नैतिकता . क्षमाशिलता . दिलदारपणा आणि वैभव होते. लक्ष्मीने आशिर्वादीत केले असे ते होते. ते समाधानी आत्मा होते. ते कांहीही चुकीचे करणार नाहीत.त्यांना कोणी विकत घेऊ शकणार नाही.

सहज योगात आल्यानंतर तुम्ही लक्ष्मीचे आशिर्वादीत आहात हे लक्षात घेणे महत्वाचे आहे.एका हातानी ती देत

असते.दुसऱ्याला दान करणें हाच तीचा स्वभाव आहे.जसं एकच दार उघडे ठेवले तर घरांत वारे वाहणार नाहील तेव्हा दुसरंही दार उघडं ठेवलं पाहिजे.समाधानी असणे हा एक सहजयोग्याचा गुण आहे.त्यांच्यापैकी काही चमत्काराबद्दल विचारतात. पण हे बरोबर नाही.आता तुम्ही आत्मा झालां आहात तेव्हा आत्मा हा मन, शरीर याच सुख न बघता आत्म्याचे सुख बघतो.तुमच्यापैकी बरेच जण आत्मा झाले आहेत पण ह्याची त्यांना जाणीव नाही तरी तुम्ही त्याबद्दल सावध असले पाहिजे.ती दुसऱ्या हाताने .तीची सेवा करतात व तीच्यासाठी काम करतात त्यांना सरंक्षण देते. ज्या कोणाकडे संपत्ती आहे त्याने नोक रीस ठेवलेल्यांना सरंक्षण दिले पाहिजे.

आपण आता अशा क्षेत्राच्या पलिकडे गेलो आहोत की जेथे आपल्या डोक्यात रुढीवाद नाही परंतु तुम्ही सर्व श्रेष्ठ अवतारी द्रष्टे. आणि पैगंबर यांची उपासना करता,त्यापैकी बऱ्याच जणांकडे संपत्ती नाही पण समाधानी आत्मा आहे. समाधान देणे हा एक श्री लक्ष्मीचा गुण आहे.तुम्हाला माहीत आहे, अर्थशास्त्रात गरजा ह्या सहसा कधीही न संपणाऱ्या आहेत,मग कोणती अशी इच्छा आहे की ती तृप्त होईल? ही शुद्ध इच्छा आहे कुं डलिनी,जेव्हा तुम्ही सर्वार्थाने समाधानी होता आणि तुमच्या लक्षात येते की सत्ता आणि पैसा यांच्यामागे लागणे ठिक नाही तेव्हा तुमच्यामध्ये महालक्ष्मी तत्व जागृत होईल.हे महालक्ष्मी तत्व तुम्हाला जिज्ञासूपणा देईल.

तेव्हां तुम्ही विशिष्ट श्रेणीचे लोक व्हाल, जसे विल्यम ब्लेक यांनी वर्णन के लेले देवदुत. तेव्हा तुमच्या गत-जीवनातील राष्ट्रवाद, जातीयवाद तुम्हाला भासणार नाही. तुम्ही उच्च प्रतिचे होणार आणि आत्मा बनणार.तुमच्यामधील लक्ष्मी तत्व समजण्याची तुमची हीच वेळ आहे.दुसऱ्याकरता तुम्हाला काही करण्यांत आनंद मिळतो तेच लक्ष्मी तत्व होय.सामुहितेची जाणिव असलेल्या तुम्हाला दुसऱ्या करीता काही करावयास पाहिजे. जर तुम्ही अजूनही स्वतःचीच, स्वतःच्याच सुखसोयींची, कमाईची आणि वैभवाची काळजी करत असाल तर तुमचे संतुलन बिघडेल.लक्ष्मी कमळामध्ये सरळ व संपूर्ण संतुलनात उभी असते.शिवाय ती संपत्तीची देवता आहे तरीही ती तीच्या शक्तिबद्दल कांही दाखवत नाही. ती स्वतःच पूर्णपणे समाधानी आहे. तुम्ही जर समाधानी नसाल तर तुम्ही स्वतःला ओळखलेले नाही.तर तुम्ही अर्धे सहज योगी आहात.सहजयोगी हा असा मनुष्य आहे कीं तो पूर्णपणे स्वतःतच, स्वतः समाधानी असतो.कारण तो स्वतः त्याचा आत्मा हा पूर्ण/अनिर्बंध ज्ञानाचा, आनंदाचे उगमस्थान आहे. आणि चित्ताचे अज्ञान दूर करण्याचेही उगमस्थान आहे. आनंद हा सुख दुःखाच्या पलीकडे आहे व तो अहंकारावर अवलंबून आहे परंतू तो अमर्याद आहे. तुम्ही आत्मसाक्षात्कार मिळाल्यावर संपत्ती वगैरेची फिकीर करित नाही. ती तुमच्याजवळ असेल तर चांगलेच आहे. नसेल तरही चांगले आहे. तुम्ही पुणर्ता: अलिप्त होता.

शेवटी मी तुम्हाला राजा जनकाची गोष्ट सांगेन जे श्रीरामाची पत्नी श्री सीता हिचे वडिल होते.ते असे राजा होते, जे सहा हजार वर्षापूर्वी होऊन गेले. त्यांना राजाला जे जे अलंकार व वस्त्रे घालावी लागतात ती ती सर्व घालावी लागत. पण त्या काळांचे सर्व संत त्यांच्या पाया पडत असत.एकदा एका गुरुच्या शिष्य नचिकेत ह्याने विचारले तुम्ही त्यांच्या पाया का पडता? शेवटी, ते राजासारखे राहतात. गुरुंनी सांगितले ते काय अ. ेत याची तुला कल्पना नाही.जर त्यांची तुझ्यावर कृपा झाल' तर ते तुला आत्मसाक्षात्कार देतील म्हणून नचिकेतांनी राजाकडे जाऊन त्याला आत्मसाक्षात्कारासाठी विनंती केली.राजा जनक म्हणाला मला क्षमा कर.मी तुला आत्मसाक्षात्कार देऊ शकत नाही. तू माझी सर्व मालमत्ता, माझे सर्वकाही घेऊ शकतोस पण मी तुला आत्मसाक्षात्कार देऊ शकत नाही कारण तुला तसे व्यक्तिमत्व मिळालेले नाही. निराश झालेला नचिकेत म्हणाला जोपर्यंत तुम्ही माझी परीक्षा घेण्यासाठी आणि मी साक्षात्कार घेऊ शकतो का हे पाहण्यासाठी तयार होत नाही, तोपर्यंत मी थांबेन,राजा जनक म्हणाला. ठीक आहे. आपण नदीवर स्नान करु या.ते जेव्हा स्नान करत होते तेव्हा राजवाड्यातून एक नोक र आला व त्याने राजवाड्याला

आग लागल्याचे जनकाला सांगितले.राजा जनकाने ध्यान करणे चालूच ठेवले.थोड्या वेळाने परत नोकर आले व त्यांनी सांगितले की या बाजूला आग वाढत आहे आणि तुमचे कपडे जळतील.पण तरीही राजा जनकाने ध्यान करणे चालूच ठेवले पण नचिकेताने आपले कपडे गोळा केले व तो बाहेर पळाला.नंतर नचिकेताला समजले की . राजा जनक हा त्याचा पैसा . मालमत्ता व कुटुंबाविषयी किती अलिप्त होता आणि माझ्याक डे पहा . यासारख्या क्षुल्लक गोष्टीविषयी चिंता करत आहे? तो राजा असल्यामुळे त्याला तशा प्रकारचा पेहेराव करावा लागे.नंतर तो राजा जनकाला शरण गेला व स्वत:साठी आत्मसाक्षात्कार मिळवला.

त्याकाळी आत्मसाक्षात्कार मिळवणे किं वा देणेसुद्धा अगदी कठीण गोष्ट होती.

पण हा वि शेष काळ आहे - बहराचा काळ आहे.ते त्याला "अखेरचा नि वाडा" म्हणतात तुम्ही त्याला "पुनरुत्थानाचा काळ" म्हणू शकतात - कुराणात जसे त्यांनी त्याला "कयामा" म्हटले आहे असे म्हटले आहे की लोक त्यांच्या थडग्यांतून बाहेर येतील आणि त्याचे पुनरुत्थान होईल. आणि थडग्यात जे काही उरेल ती फक्त काही हाडे असतील नव्हे हे सर्व आत्मे जे मरण पावले आहेत ते मनुष्य जन्म घेतील आणि ह्या विशेष काळांत त्यांचा आत्मसाक्षात्कार घेतील.

तुमच्या मागील जन्मातील चांगल्या कर्मांमुळे ज्याला आपण पूर्व-पुण्य म्हणतो त्यामुळे तुम्हाला आता आत्मसाक्षात्कार मिळाला आहे. पण तुम्ही त्याचा आदर केला आहे पाहिजे.व जाणले पाहिजे की जे तुम्हाला मिळाले आहे ते किती महान आहे तुम्ही आता आत्मा आहात हे तुम्ही जाणायला हवे. तुम्ही विशेष लोक आहात. तुम्ही तुमच्या देशाच्या समुदायाच्या समाजाच्या आणि कुटुंबाच्या समस्या सोडवणार आहात.संपूर्ण जगाच्या समस्या तुम्ही सोडवणार आहात.तुम्हीच असे आहात जे या पृथ्वीवर शांतता आणणार आहात. तुम्हीच आहात जे सुंदर ईश्वरी लोकांचे नवीन साम्राज्य तयार क रणार आहात.

तुमच्या स्वत:वर विश्वास ठेवा.हा विश्वास खूप वेगाने कार्यरत होतो. हा अंधविश्वास नसून. वस्तुस्थिती आहे. सहजयोगांत वृद्धींगत व्हा आणि ठेंगू राहू नका.

आता तुम्ही लक्ष्मीच्या आशिर्वादांसाठी मागणी करत आहात. प्रथम गोष्ट जी तुम्ही मागितली पाहीजे ती आहे समाधान. व मग औदार्य ज्या मनुष्याला श्री लक्ष्मीचे आर्शिवाद आहेत तो कंजूष असू शकत नाही.तुमची कुठलीही कर्मे राहिली नाहीत हे तुम्हाला ठाऊक आहे.ते सर्व संपले आहे व आता तुम्ही सुंदर नवीन लोक आहात.बहराचा काळ आला आहे.तुमच्या आजारांकडे . त्रासांकडे लक्ष देऊ नका.गोष्टी निश्चितपणे सुधारतील कुणीतरी मला सांगत होते की त्याच्या गुडघ्यात कळ येत आहे.मला भासले की मी तुमच्याकडून शोषून घेत असल्यामुळे कितीतरी वेळा मला गुडघ्यात कळ येते . पण मी त्याविषयी कधीच विचार करत नाही . मी कधीच चिंता करत नाही . कारण मला माझे शरीर ठिक वाटते.ह्या मशीनप्रमाणे . जर ते खराब झाले . तर तुम्ही ते ठीक करा. संपले . पण जर सर्वकाळ तुम्ही असा विचार करत असाल की मला इथे दुखते आहे . तिथे दुखते आहे . माझ्याकडे इतका पैसा आहे . मला हे करायचे आहे . हा बिजनेस करायचा आहे . तो बिजनेस करायचा आहे . तर संपले.आता आपल्याला उच्च जाणीवेच्या राज्यात रहायचे आहे. मी सर्व उदात्त व सुंदर गोष्टींवर बोलत राहू शक ते.पण लेक्चर्स ही काही नसून शब्दांची जाळी आहेत.तुम्हाला मनाच्या पलिकडे जावयाचे आहे.हेच माझ्या डोळ्यापुढचे दृष्य आहे आणि कित्येकांनी ते पूर्ण केलेले आहे.मी सदैव तुमचीच आहे आणि तुम्हाला जिथे मी यायला हवी असेन तेथे मी येईन.माझे प्रेम हे माझ्या इच्छेपेक्षाही अधिक आहे. पण तुम्ही तुमच्या स्वत:वर व तुमच्या आत्मसाक्षात्कारावर प्रेम केले पाहिजे.

**ईश्वर तुम्हाला आशिर्वादीत करो.**

# हजारो सहज योग्यांच्या माऊली

## परम पूज्य श्री माताजी निर्मलादेवी

**क्व सूर्य प्रभवो वंश: क्व चाल्प विषयां मति:**

परम पूज्य श्री माताजींच्या बद्दल काही लिहायचे म्हटले की कालिदासाची वरील उक्ति ध्यानात येते,हा महान जीव ह्या भारत भूमीत अवतरेल अशी भविष्यवाणी भृगु मुनींनी आपल्या नाडीग्रंथात केली होती. त्या भविष्यवाणीचा सांगोपांग गणिताने शोध करुन महान अवतरणाचा जन्मकाल १९२३ ते १९२४ च्या दरम्यान व सहजयोगाची सुरवात १९७० साल असे स्वामी भुजंदर ह्यांनी ठामपणे लिहिले होते. १९७० साली एक अनन्य साधारण शोध श्री माताजींनी लावला,सहजयोग हे त्याचे नाव वेदान्तात,तसेच अनेक संस्कृत शास्त्रांत कुंडलिनीचा उल्लेखच नव्हे तर कुंडलिनी उत्थापन हाच आत्मसाक्षात्काराचा मार्ग सांगितला होता. त्या उपरान्त १२ व्या शतकांत श्री ज्ञानेश्वरांनी नाथपंथियाची एक गुरु एक शिष्य ही परंपरा मोडून आपल्या गुरुवर्यांची परवानगी घेऊन मराठी भाषेत पहिल्यांदा ज्ञानेश्वरीत जनसाधारणासाठी कुंडलीनीची व्याख्या केली. त्यानंतर अनेक संतानी भक्तीकालांत संबंध भारत वर्षात कुंडलीनीचे वर्णन केलेले आहे. त्या श्री. ज्ञानेश्वरांच्या पसायदानाचा साक्षात श्री माताजींनी आज हजारो लोकांची कुंडलिनी जागृत करुन आम्हां सर्व छपन्न देशांतील सहजयोग्यांना धन्य केले आहे,आम्ही सर्व सामुहिक चेतनेत जागृत झालो आहेत आणि विश्व निर्मल धर्म सर्व विश्वांत दैदिप्यमानतेने सहजयोगींच्या जीवनात उतरला आहे,सहजच आम्ही आत्मबोधाला प्राप्त झालो. सर्व प्रथम चराचरांत पसरलेल्या परमचैतन्याची सौदर्यलहरींची जाणीवं बोटांवर

होते,तसेच आपल्या व दुसऱ्यांच्या चक्रांची जाणीव बोटांवर हो
फक्त त्या चक्रांची स्वच्छता कशी करायची हे जाणावे लाग
परिवर्तीत जीवन होऊन ते परमेश्वरी प्रेमांत बांधले गेलो,सहजयोग
आमची रोगराई गेली, मनांतली किल्मिषे गेली, आम्ही आत
बाहेर शुद्ध निर्मल झालो, आम्ही समर्थ झालो नि एका दीप
अनेक दीप पाजळू लागले,हे सर्व मिळाले काहीही खर्ची न कर
काहीही प्रयत्न न करता असे आम्ही परमेश्वराच्या साम्राज्य
आलो, अंधकारातून बोधाच्या प्रकाशात आम्हाला निर्वेधपणे
हळूवारपणे श्री माताजींनी आणून सोडले,हे शक्य झाले आहे
मग प्रश्न उभा राहतो कि न भूतो न भविष्यती हे असले अद्
अपूर्व आध्यात्मिक कार्य या घोर कलियुगात करणाऱ्या ह्या
माताजी कोण?

परम पूज्य श्री माताजी निर्मलादेवी श्रीवास्तव यांचा जन्म
मार्च १९२३ रोजी चिंदवाडा येथे दुपारी १२ वाजता झाला,२१ म
या तारखेस दिवस व रात्र समान असतात, चिंदवाडा हे श
भारताच्या बरोबर मधोमध असणाऱ्या कर्कवृत्ताच्या मध्यभा
वसले आहे, जन्मवेळ दुपारी १२ वाजता, म्हणजे सूर्य बरो
डोक्यावर असता,अशा प्रकारे श्री माताजींची जन्मवेळ , जन्मदि
व जन्मस्थान वैशिष्ट्यपूर्ण आहेत,मानवाची सूप्त कुंडलिनी श
जागृत करुन त्याला संतुलनात प्रस्थापित करुन आत्मसाक्ष
करण्याच्या त्यांच्या कार्यांचे हे द्योतक आहे,श्री माताजींचा जन
इतिहास प्रसिद्ध शककर्त्या शालिवाहन राजांच्यावंशात झा
अहमदनगर जिल्ह्यातील नांदगाव शिंगवे या गावात त्यांच
आजोबांचे वास्तव्य होते,व आईचे माहेर घर नांदगावी होते,

वडील, श्री प्रसादराव केशवराव साल्वे नागपूर येथे ख्यातनाम वकील होते,घरात उदंड श्रीमती व वैभव नांदत होते,पण गांधीजींच्या सहवासात आल्यावर या सर्वांचा त्याग करुन देशकार्याला त्यांनी वाहून घेतले,अनेक वर्ष कारावास भोगला श्री माताजींच्या मातोश्रींनी फर्ग्युसन कॉलेजची गणिताची मास्टर्स डीग्री मिळवली होती,त्यांचे गुरु रँग्लर परांजपे होते,त्यांना सुद्धा स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय भाग घेतल्याबद्दल अनेकदा तुरुंगात जावे लागले. औदार्य, त्याग, देशभक्ति इत्यादी महान सद्‌गुणांच्यामुळे आदर्श साल्वे दांपत्याबद्दल सर्वांनाच प्रेम व आदर वाटत असे.

साल्वेसाहेब मध्यवर्ति कायदेमंडळावर निवडून गेले, राज्यघटना समितीचे सभासद झाले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या बरोबरीने राज्य घटनेचा मसुदा बनविण्यात त्यांनी महत्वपूर्ण भूमिका निभावली. एकमेव ख्रिश्चन सभासद असल्याने, घटना समितीच्या अल्प-संख्याकांच्या विषयीच्या उपसमितीचेही ते सभासद होते.

श्री प्रसादरावजी साल्वे चारित्र्य संपन्न शास्त्रपंडित व आत्मसाक्षात्कारी गृहस्थ होते,आपली मुले आदर्श नागरीक व देशभक्त व्हावीत इकडे त्यांचा कटाक्ष असे,त्यामुळेच सर्व परिवाराने संपत्ति, वैभव, श्रीमंती आदींचा आनंदाने, अभिमानाने व हसत त्याग केला, श्री माताजी आपल्या वडिलांना गुरुस्थानी मानतात, कारण "त्यांनीच मला मानवांची ओळख करुन दिली,वडिलांच्या मार्गदर्शनानेच मी जाणले कि मानव किती अज्ञानाच्या सागरात दडपला आहे."

लहानगी निर्मला, प्रेमळ, निर्भय व निरागस, हुषार व अत्यंत क्रियाशील स्वभावामुळे नातेवाईकांच्यापासून ते नोकरांपर्यंत सर्वांची लाडकी होती. घरातील पाळीव पशुपक्ष्यांना तिचे प्रेम मिळत असेच पण सापाचेही भय तिला नव्हते,शिवाय सतत आनंदी व उत्साही असल्याने समवयस्क मुले-मुली सतत तिच्या बरोबर असत. सर्वजण, अर्थात निर्मलेच्या पुढाकाराने, नाच, गाणी, छोटी नाटके बसविणे इत्यादीच्या आनंदात रममाण होत. संगीत व कला यांचा रसास्वाद घेण्याची श्री माताजीची आवड व क्षमता लहानपणीच घरातील मंडळींच्या लक्षात आली.

वयाच्या सातव्या वर्षी एका नाटकात श्री माताजींनी श्रीकृष्णाची भूमिका केली होती,त्यावेळी भूमिकेशी संपूर्ण तादात्म्य साधल्याने श्रीकृष्णाचे माधुर्य, आनंदीपणा इत्यादी गुणांचा अविष्कार त्यांच्या अभिनयातून सहजच होत असताना नाटकाचा प्रेक्षक वर्ग त्यांच्याशी अगदी समरस झाला होता. त्यानंतर बरेच वर्ष त्यांना श्रीकृष्ण म्हणूनच त्यांच्या वडिलांचे मित्र हाक मारीत असत,कधी कधी मात्र,घरातली एखाद्या शांत ठिकाणी, एकट्याच, ध्यानमग्न व आत्मानंद चेहऱ्यांवर बिलसत आहे,अशा स्थितीत त्या बसलेल्या आढळायच्या. लहान वयात आई-वडिल कारागृहांत गेल्यावर, घरचा सर्व व्यवहार श्री माताजींच सांभाळत होत्या.

१९४०-४१ सालात वयाच्या सतरा-अठराव्या वर्षी नागपूरला,गव्हर्मेंट कॉलेज मध्ये असताना, कॉलेजच्यासमोर, जमावबंदीचा हुकूम मोडून, विद्यार्थ्यांच्यासमोर त्यांनी भाषण केले होते, त्यावेळी त्यांना अटक करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर सशस्त्र पोलीस तैनात करण्यात आले,त्यानंतर त्यांना अनेकदा अटकेत ठेवण्यात आले,त्या वर्षभर भूमिगत होत्या, वारंवार अत्यंत दुःखदायी जुलमी छळ सोसावा लागला,कॉलेजातून रस्टिकेट करण्यात आले.

त्यावेळचे गव्हर्मेंट कॉलेजचे प्राचार्य डॉ.कृष्णमूर्ति यांनी वरील प्रसंग आम्हाला जवळ जवळ ४५ वर्षांनी सांगितला, त्यावेळीही श्री माताजींच्या असामान्य धैर्याचे कौतुक व अभिमान त्यांना वाटत होता, ते म्हणाले कि "मी तेव्हाच ओळखलं कि हा शक्तीचा अवतार आहे." श्री माताजींना रस्टिकेट करण्यास त्यांनी सपशेल नकार दिला व त्यामुळे त्यांची बदली करण्यात आली होती,मार्च १९८६ मध्ये पुण्यात श्री माताजीच्या भाषणाच्या कार्यक्रमानंतर डॉ.कृष्णमूर्ति श्री माताजींना बऱ्याच वर्षांनी भेटले, तेव्हा त्यांना आनंदाश्रू आवरेनात.

नागपूरच्या प्रसंगानंतर श्री माताजींनी लाहोरला वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेतला, त्या ठिकाणीही सर्वांना त्या अतिशय प्रिय होत्या, काही वर्षापूर्वी लंडन येथे, वैद्यकीय महाविद्यालयांतील त्यांच्या एका प्राध्यापकांची श्री माताजींच्या शिष्यांनी भेट घेतली, तेव्हा श्री माताजींची बुद्धिमत्ता व आज्ञाधारकपणा, यांचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला,त्यांच्या बरोबर शाळा कॉलेजात शिकलेल्या कांही महिला आम्हाला भेटल्या असताना, त्या सर्वांनीच श्री माताजींचे विषयी प्रेम व आदरभाव व्यक्त केले.

स्वातंत्र लढ्यात भाग घेत असताना श्री माताजी

गांधीजींच्या आश्रमात राहिल्या होत्या. ते सुद्धा आत्मसाक्षात्कारी होते,गांधीजी त्यांना नेपाळी म्हणायचे व फार सन्मानाने वागवायचे,आश्रमात ज्या प्रार्थना म्हटल्या जात त्याची रचना श्री माताजींच्या सल्ल्याने करण्यात आली होती,श्री माताजी म्हणतात कि जर स्वातंत्र्य संग्रामाबरोबरच आध्यात्माची पूर्ण सांगड बसवली असती तर आपल्या देशाचे राज्यकर्ते हितकारी झाले असते,त्यांनी सांगितले होते कि आधी देश स्वतंत्र झाला पाहिजे,तद्नंतरच अध्यात्मिक कार्य होऊ शकते.

स्वातंत्र्य प्राप्तिनंतर, डॉ. चंद्रिकाप्रसाद श्रीवास्तव ह्यांच्याबरोबर श्री माताजींचा विवाह झाला,भारतीय प्रशासन सेवेतील (आय.ए.एस.) एक कार्यक्षम अधिकारी म्हणून श्रीवास्तव साहेब प्रसिद्ध आहेत. श्री लाल बहादूर शास्त्री पंतप्रधान असताना श्रीवास्तव साहेब त्यांचे ज्येष्ठ सहसचिव होते.शास्त्रीजी सुद्धा आत्मसाक्षात्कारी होते.ते माताजींना फार मानत असत,पुढे श्रीवास्तवसाहेब शिपिंग कार्पोरेशन ऑफ इंडियाचे चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर झाले,त्यांच्या कारकिर्दीत कंपनीचा विस्तार वाढून जगातील प्रमुख कंपन्यांच्यात तीची गणना होऊ लागली,त्यांच्या कर्तृत्वामुळे १९७१ साली भारत सरकारने पद्मभूषणची पदवी देऊन त्यांचा गौरव केला.

नंतर यूनोच्या इंटरनॅशनल मॅरीटाईम ऑर्गनायझेशन या संस्थेचे महासचिव म्हणून श्रीवास्तव साहेबांची १३४ सभासद देशांनी चार वेळा बिनविरोध निवड केली.त्यांच्या कार्याची जगभरच्या सर्व देशांनी प्रशंसा केली.आतापर्यंत अशी पदवी मिळालेले ते पहिलेच भारतीय आहेत. शिवाय इतर ३१ देशांनी त्यांना त्या देशांतील सर्वोच्च सन्मान प्रदान केले आहेत आजतागायत कोणत्याही मानवाला एवढी सन्मान ,संपत्ति मिळालेली नाही,स्वीडन या देशात मॅरीटाईम या विषयावर जगातील एकमेव विद्यापीठ आहे व श्रीवास्तव साहेब त्याचे कुलपति आहेत. तसेच अनेक विद्यापीठांनी त्यांना डॉक्टर ऑफ लॉजच्या सन्माननीय पदव्या प्रदान केल्या आहेत.

श्रीवास्तव साहेबांच्या या यशाच्या मागे श्री माताजींचा त्यांना सतत मिळत असणारा पाठिंबा ,सहकार्य व मार्गदर्शन यांचा फार महत्वाचा वाटा आहे.अनेक सत्कार समारंभात श्रीवास्तव साहेबांनी याचा जाहीर उल्लेख केला आहे,सासरच्या नातेवाईकांच्या मध्येही श्री माताजी अतिशय प्रिय आहेत.ते म्हणतात,"त्या साक्षात गृहलक्ष्मी आहेत,श्रीवास्तव परिवारात त्या आल्या तेव्हापासून वैभव ,मानसन्मान वगैरे सातत्याने घरात येत आहेत." त्यांनी जवळजवळ आपल्या नात्यातील पस्तीस तरुण मुलामुलींचे शिक्षण करवून सर्वांचे भले केले आहे.अनेक लोकांनी त्यांच्या मूक परोपकारी स्वभावाची महती सांगितली आहे. श्री माताजींच्या आगमनाची बातमी समजताच सर्व नात्यातील मंडळी त्यांना भेटण्यासाठी एकत्र येतात.

श्री माताजी अतिशय गृहकृत्य दक्ष आहेत,घरी येणाऱ्या प्रत्येकाचा मग तो जवळचा नातेवाईक असो की एखादी अपरिचित व्यक्ति असो,यथोचित आदर सत्कार होत आहे इकडे त्या स्वतः लक्ष देतात,सहजयोगाच्या कार्याची व्याप्ती वाढत असताना कौटुंबिक व सामाजिक जबाबदाऱ्यांच्याकडे त्यांचे थोडेही दुर्लक्ष होत नाही. लग्नात त्यांनी श्रीवास्तव साहेबांना दोनच अटी घातल्या होत्या,एक तर दारु प्यायची नाही व दुसरे घरांत एक पै सुद्धा बेईमानीची आणायची नाही.

घरातील नोकरचाकर. श्रीवास्तव साहेबांच्या कार्यालयांतील कर्मचारी ,यांनाही अतिशय प्रेमाने वागविले जाते,शिपिंग कार्पोरेशन ऑफ इंडियाचे. श्रीवास्तव साहेबांच्या वेळचे कर्मचारी अद्यापही श्री माताजींच्या आठवणी सांगतात", श्री माताजी आम्हाला आई सारख्या होत्या,जणुकाही आम्ही सर्व त्यांचे कुटुंबिय होतो,असे त्या आमच्यावर निस्सिम प्रेम करीत." श्रीवास्तव साहेब अत्यंत प्रामाणिक, निरिच्छ, शिस्तबद्ध व कार्यनिपुण असे देशप्रेमी सरकारी अधिकारी राहिले.त्यांत श्री माताजींचा प्रेमाचा ओलावा मिळाल्यामुळे सर्व कार्यालयातील मंडळी एकत्र बांधली गेली होती.

जगातील हजारो सहजयोग्यांच्यावर आपल्या दोन कन्या, जावई व नातवंडे यांच्या इतकेच त्यांचे प्रेम आहे. सहजयोग्यांनी कसे रहावे, कसे वागावे, लहान मुलांची कशी काळजी घ्यायची यांच्या बाबतीत त्या फार प्रेमाने बारीक सूचना करतात,त्यांच्या वैयक्तिक ,कौटुंबिक अडचणी सोडविण्यास मदत करतात. जातपात, धर्म, देश-विदेश, श्रीमंत-गरीब, सुशिक्षित-अशिक्षित अशा भेदभावास तिथे थारा नाही.

आईच्या वात्सल्याचे छत्र सर्वांच्यावर धरीत असताना, दोषही स्पष्टपणे दाखवून देतात,मग त्या सहजयोग्यांच्या

समवेत असोत की सार्वजनिक सभेत त्या त्यास अपायकारक रुढी, परंपरा, वाईट गुरु, अंधश्रद्धा, आध्यात्मिक प्रगतिच्या विरुद्ध असणाऱ्या सवयी, इत्यादींच्यावर चौफेर टीका करताना त्या म्हणतात," मी काही तुमची मते मागण्यासाठी आले नाही. मी तुमची आई आहे. तुमच्या हिताचे आहे ते मी सांगणारच." पाश्चात्य देशांमध्ये भाषण करतानाही हीच भूमिका व स्पष्टोक्तिक असते, यात कृत्रिमता नाही. सर्वांच्या विषयी वाटणारी आत्मियता व त्यांच्या कल्याणाची तळमळ, यांच्यातून सहजच सर्व कार्य घडत असते, म्हणूनच बहुजन हिताय बहुजन सुखाय असा सहजयोग अधिकाधिक लोकांच्या पर्यंत जावा - म्हणून स्वतःच्या खर्चानी सर्व दौरे करतात, व अथक परिश्रम करतात, सहजयोगामुळे घडून येणारी आध्यात्मिक प्रगति, शारिरीक व मानसिक आरोग्य, सर्वांगीण उन्नति, शेतीविषयक संशोधन इत्यांदींची विनामूल्य माहिती दिली जावी असा त्यांचा कटाक्ष असतो.

श्री माताजींना पुस्तके वाचायला वेळ नसतो तरी त्यांचे अगाध ज्ञान पाहून रशियाचे वैज्ञानिकसुद्धा हतबुद्ध झाले. अध्यात्मासारखा गंभीर विषयी श्री माताजी इतका सोपा करुन सांगतात की सर्व प्रकारच्या लोकांना त्यांचे विचारांचे आकलन होते, शिवाय अधून-मधून त्या फार विनोदपूर्ण बोलतात, कधीही अश्लील किंवा दुःखदायी शब्द वापरत नाहीत, त्यांच्या भाषणात सर्व शांत होतात, व्याख्याने म्हणजे श्रोत्यांना आनंदाची पर्वणीच असते.

श्री माताजी इतक्या महान आहेत तरी त्या कधीच गंभीर नसतात, गायनशास्त्र, वैद्यकशास्त्र शिल्पशास्त्र, कलाशास्त्र, वास्तुशास्त्र, विज्ञान, धर्मशास्त्र, कोणत्याही विषयावर समर्थपणे व सहजरित्या बोलतात, त्या बोलत असताना कोणताही विषय अत्यंत सूक्ष्मपणे सांगतात तरी कंटाळवाणा होत नाही व सहज आकलन होते.

त्यांच्या स्वभावात फारच गोडवा व महान शालिनता आहे, पण ती महनता चैतन्याचा सागर आहे, त्या सागरात उठणाऱ्या आनंदाच्या लाटा समोरच्यांना अंर्तबाह्य चैतन्याने सचैल स्नान घालतात, "आनंदाचे डोही आनंद तरंग" या उक्तिचा साक्षात सदासर्वदा अनुभव मिळतो.

त्यांच्या चरणाच्या जवळ बसलेल्या अनेक लोकांचे तासन् तास कसे जातात ते समजत नाही, त्या निघून जाणाऱ्या तासांचे, घडणाऱ्या घटनांचे, उपस्थितांच्या हृदयाचे, रेशमी धागे गुंफून जणुकाही त्याचे एक सुंदर सामुहिकतेचे वस्त्रच त्या तयार करतात, ते वस्त्र प्रत्येकांच्या जवळ, त्यांच्या जीवनाचा अमूल्य ठेवा म्हणून रहते, कारण त्यांच्यामुळे माणसांची हृदये-हृदयांशी, मने-मनांशी जोडली जातात व शेवटी सर्व श्री माताजींच्या हृदयाशी संलग्न होते.

**हृदयी हृदयी एक जाहले ।**
**ये हृदयीचे ते हृदयी घातले ॥**

सहजयोग्यांशी बोलताना, सार्वजनिक कार्यक्रमात भाषण करताना, आत्मसाक्षात्काराची अनुभूति देत असताना, शास्त्रज्ञांशी, डॉक्टरांशी चर्चा करताना, अथवा अगदी घरगुती काम करताना, श्री माताजींचे त्यांत पूर्णपणे लक्ष व निरिक्षण असते, पण तरीही, त्या प्रत्येक प्रसंगी सर्वांच्यापासून अलिप्त असतात, सर्वांच्याही पलिकडे असतात, त्यांच्या विभूतिमत्वाचे कोणत्याच प्रकारे वर्णन करता येत नाही. श्री माताजी म्हणजे अमर्याद प्रेमाची व करुणेची, अथांग शांतिची, अपार ज्ञानाची, असीम औदार्याची, उदात्ततेची, राजवैशवर्यात राहूनही साधेपणाची, लहानमुलांच्या निरागसतेची, साक्षात मूर्ति आहेत, श्री माताजी म्हणजे मानवी बुद्धीने जाणलेल्या सर्व संकल्पनांच्याही पलिकडची मानवी बुद्धीला अगम्य असलेली संकल्पना आहेत, त्या संकल्पनेला जाणण्यासाठी आत्मसाक्षात्कार घेऊन निर्विचारतेच्या निरामय आनंदाच्या समुद्रात स्वतःला झोकून द्यायचे.

**काय वानू आता न पुरे हि वाणी ।**
**मस्तक चरणी ठेवीतसे ॥**

औद्योगिक कारखान्यांच्या मुळे, जमीन, पाणी आणि वायू दूषित होत आहेत,त्यातून बाहेर पडणाऱ्या रसायनाच्या मुळे ओझोन वायुचा थर कमी होत आहे,समुद्रातील प्राण्यांचे जीवन नष्ट होते आहे,जमीनीचे रक्षण करणारी जंगले नष्ट होत आहेत.

**हे आदिशक्ति कृपा करुन मानवाच्या या दुष्कृत्याचे निराकरण करा.**

आम्ही हायड्रोजन बॉंब तयार केला, त्याच्यासाठी लागणारे कारखाने आणि त्यातून पुढिल शेकडो वर्षे मानवाच्या अस्तित्वासच धोकादायक अशी रेडिओ ॲक्टव्ह किरणांचे उत्सर्जन करणारी द्रव्ये तयार केली.

**हे आदिशक्ति कृपा करुन मानवाच्या या दुष्कृत्यांचे निराकरण करा.**

आधुनिक शस्त्रास्त्रांच्या मुळे युद्धाचे परिवर्तन असंख्यांच्या निर्घृण संहारामध्ये होत आहे आणि शस्त्रास्त्राचे व्यापारी मृत्युचा विक्रय करुन आर्थिक साम्राज्ये निर्माण करीत आहेत.

**हे आदिशक्ति मानवाच्या या दुष्कृत्यांचे निराकरण करा.**

या युद्धांच्यामध्ये होणाऱ्या नर संहारातून लक्षावधी भूते या पृथ्वीवर वास्तव्य करीत आहेत.

**- हे आदिशक्ति मानवाच्या या दुष्कृत्याचे निराकरण करा.**

इलेक्ट्रॉनिक यंत्रणा आणि यंत्रे यांच्यामुळे मानवी मेंदूचे यांत्रिक प्रक्रिया घडविणाऱ्या रोबोमध्ये परिवर्तन होत आहे.

**हे आदीशक्ति मानवाच्या या दुष्कृत्यांचे निराकरण करा.**

जैविक तंत्रज्ञान आणि जेनेटिक् मॅनिप्यूलेशन यांच्यामुळे मानवास अपायकारक द्रव्ये बाहेर टाकली जातील अथवा राक्षसी प्राणी तयार होतील.

**हे आदिशक्ति मानवाच्या या दुष्कृत्याचे निराकरण करा.**

निरागसता नष्ट झाल्याने आमच्या मुलांचे आणि परिवारांचे भवितव्य धोक्यात आले आहे, आणि त्याच्यामुळे समाजाचे अस्तित्व धोक्यात आहे.

**हे आदिशक्ति मानवाच्या या दुष्कृत्यांचे निराकरण करा.**

सिनेमा व टेलिव्हीजनचे माध्यमातून हिंसाचार व लैंगिक विकृतिंचे प्रदर्शन केले जात असल्याने असंख्य लोकांचे चित्त दूषित होत आहे. **हे आदिशक्ति मानवाच्या या दुष्कृत्यांचे निराकरण करा.**

आधुनिक जीवनातील कॅन्सर, एडस् व इतर मनोविकार, मानव निर्मित वातावरणाचा परिणाम आहेत. **हे आदिशक्ति मानवाच्या दुष्कृत्यांचे निराकरण करा.**

मद्यपान व अमली पदार्थ यांच्यामुळे मानवाच्या चेतनेवर विपरीत परिणाम होत आहे. **हे आदिशक्ति मानवाच्या या दुष्कृत्यांचे निराकरण करा.**

मानवाच्या हृदयातील भावनांची कदर न राहिल्याने जन-सहाय्य करणाऱ्या सेवा-संस्था/यंत्रणा कोलमडून पडत आहेत,इस्पितळे रुग्णांवर प्रयोग करुन पैसे मिळविण्याच्या यंत्रणाच्यांत परिवर्तित होत आहेत. वकील मंडळी व्यावसाईक फसवेगिरी करणाऱ्याच्यात परिवर्तित होत आहेत. हे **आदिशक्ति मानवाच्या या दुष्कृत्यांचे निराकरण करा.**

भ्रष्ट शासनांना आणि राजकारणी लोकांना कलियुगातील प्रश्नांची सोडवणूक करता येत नाहिच पण त्यामध्ये ते लोक मोठ्या प्रमाणावर भर घालीत आहेत, हे **आदिशक्ति मानवाच्या दुष्कृत्यांचे निराकरण करा.**

राजकीय हुकूमशाही आणि धर्मवेडेपणा यांनी बेलगाम हिंसाचारास मान्यता दिली आहे. **हे आदिशक्ति मानवाच्या दुष्कृत्यांचे निराकरण करा.**

आणि शेवटी, श्री माताजी हा देश जो सर्व एकात्मतेची भूमी होऊ शकतो, त्यामधील लोकांचे मेंदू लहान कणांच्या मध्ये विभागला गेला आहे. त्यामुळे त्या मेंदूना आपल्या संपूर्णत्वाची दृष्टी, आपल्या योजनांची दृष्टी प्राप्त होत नाही. हे **आदिशक्ति उपरोक्त आणि इतर अनेक दुष्कृते जी आमच्या कर्मांची फळे आहेत, ती सर्व होली स्पिरीटच्या वाऱ्याने उडून जाऊ दे.**

**"बुद्धं शरणम् गच्छामि धम्मं शरणम् गच्छामि संघ शरणम् गच्छामि"**